CONTEMPORARY RESEARCH IN INDIA (ISSN 2231-2137): VOL. 7: ISSUE: 1 (2017)

# रमाबाई पेशवे यांचे मराठ्यांच्या इतिहासातील स्थान

**प्रा. अंकुश वाघमारे,** *एम.ए. एम.एड्. एम.फिल., संशोधक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद*

Received: 23/02/17 | Edited: 28/02/17 | Accepted: 03/03/17 | Area: History

मराठ्यांच्या इतिहासात अनेक कर्तबगार स्त्रिया होऊन गेल्या. त्यांनी आपआपल्या काळात महत्वपूर्ण भूमिका बजावली त्यामध्ये रमाबाई पेशवे यांचे स्थान अतिशय महत्वाचे ठरते.

रमाबाई यांचे माहेरचे उपनाव जोशी असे होते. त्यांच्या पित्याचे नाव शिवाली बल्लाळ असे होते. रमाबई जन्म इ.स.१७४८ मध्ये झाला. शिवाजी बल्लाळ मूळचे गराडचे त्यांच्याकडे संगमनेर, सोलापूर, मिरज येथील कोटांवरील अधिकारीपण होते. शिवालीपंतांचा इ. स. १७६७ मध्ये मृत्यू झाला. त्या वेळी रमाबाई विवाह माधवरावांशी थोड्या घाईने पण मोठ्या थाटात पार पडला. हा विवाह रविवार दि. ९ डिसेंबर १७५३ रोजी पुण्यामध्ये झाला. लग्नाच्या वेळी रमाबईचे वय पाच वर्षाचे होते तर माधवरावांचे वय आठ वर्षाचे होते. रमाबाई माधवरावांच्या सोबत त्यांच्या सावलीप्रमाणे राहिल्या.

माधवरावांचा विवाह प्रथम नरहर अप्पाजी वैद्य यांच्या मुलीशी ठरला होता. इ. स. १७५३ मध्ये मुहूर्त निश्चित झाला. परंतु काही दिवस आधी मुलीला मूळ नक्षत्र असल्याचे लक्षात आल्यामुळे विवाह मोडला होता. नुकसान भरपाई द्रव्यदान देऊन वधूपक्षाची समजूत काढण्यात आली. या घटनेनंतर माधवरावांच्या रमाबाईशी विवाह निश्चित झाला. १) गोपिकाबाईसारख्या कडक शिस्तीच्या सासूच्या हाताखाली रमाबाई लहानाच्या मोठया झाल्या. स्वभावाने अत्यंत प्रेमळ, नम्र आणि आपल्या पतीच्या सेवेसाठी नेहमी तत्पर असणाऱ्या रमाबाईचे स्थान अतिशय मनाचे होते. पेशवाची पत्नी म्हणून त्यांनी कधीही आपला रुबाब दाखविला नाही. म्हणूनच त्यांना आदराचे स्थान होते.

थोरल्या माधवरावांची कारकिर्द अत्यंत धामधुमीची असे. माधवराव स्वारीत व्यस्त असतांना रमाबाई आपला संपूर्ण वेळ केवळ दानधर्म आणि पूजाअर्चेमध्ये व्यतीत करीत असत. इ.स. १७८९ च्या कर्नाटकच्या तिसऱ्या स्वारीत माधवरावांची तब्येत ठीक नसल्याने रमाबाई व नारायणराव स्वारीबरोबर गेले होते. २) रमाबाई अत्यंत पतिसेवानिष्ठ होत्या. सेवानिष्ठेत त्यांनी प्रचंड तपश्चर्या केली आणि नवऱ्याची कडक शिस्त आनंदाने पाळून लौकिक मिळविला. राज्यकारभारात मात्र त्यांचा अजिबात सहभाग नव्हता. राज्यकारभार करण्याची किंवा सामाजिक कार्यात भाग त्यांना मुळातच आवड नव्हती. माधवराव कडक स्वभावाचे असल्यामुळे स्वत:च्या जबाबदारीने त्यांच्या पश्चात कोणतीही गोष्ट करण्याचे अमाप विश्वास असल्यामुळे त्यांनी कधीही मनात नव्हते. रमाबाईना आपल्या कर्तृत्वाबद्दल अमाप विश्वास असल्यामुळे त्यांनी कधीही मनात आणले नव्हते. रमाबाईंना आपल्या कर्तृत्वाबद्दल अमाप विश्वास असल्यामुळे त्यांनी आपल्या वागण्याने माधवरावांना कधी त्रास होणार नाही, याची दक्षता घेतली होती. रमाबाईंनी एकदा आपल्या कारकून जिजाजी परशुराम यास पुण्यात पटवर्धनांकडे बोलावून आपल्या अंबारीसाठी चांगली हत्तीण देण्यास सांगितले. या बदलत चांगला हत्ती देण्याची त्यांनी कबूली दिली. पण मोरोबा पटवर्धनाने उडवाउडवी करुन चांगली हत्तीण नसल्याचे कळवून टाळाटाळ केली व हत्तीण दिली नाही. ३) या बाबतीत त्यांनी आपल्या पतीला मात्र अजिबात काही कळू दिले नाही.

रमाबाई या हाडाच्या सात्विक होत्या. अत्यंत गरीब स्वभावाच्या असून त्या अत्यंत धर्मनिष्ठ होत्या. इ. स. १७७२ मध्ये त्या हरिहरेश्वराच्या यात्रेला गेल्या होत्या. अनेक वेळेस त्या हरिहरेश्वराच्या यात्रेस जात असत. त्यापैकी १७६८ च्या यात्रेचा तपशील सापडतो. या यात्रेसाठी २५२६ रुपये खर्च झाला होता. गंगाबाई आणि पार्वतीबाई यादेखील रमाबाईसोबत होत्या. हुजूरखाना, कामाढी, उष्टरखाना (उंट), पीलखाना (हत्ती) वाजंत्री वगैरे सर्व तऱ्हेचा लवाजमा सोबत होता. यात्रेत रमाबाईंनी इतरही देवदर्शने केली होती. ४) दिवे तेथे देवदर्शनाला जात असतांना मतगड किल्ल्यावरुन त्यांच्या सन्मानार्थ १३ तोफा उडविण्यात आल्या. पुढे इ. स १७६८ साली हरिहरेश्वर येथे रमाबाईंनीच माधवरावांकडून चौघडा सुरु केला. स्वत:च्या आजारपणात माधवरावांनी फार आग्रह केल्यामुळे इ. स. १७७२ च्या पूर्वार्धात त्या हरिहरेश्वरास गेल्या. हरिहरेश्वराच्या यात्रेची तयारी अगोदर दोन - तीन महिने चालली होती. जंजिऱ्यात सिद्दी याकूबखान होता. त्यांचा आणि पेशव्यांचा इ.स १७७१ मध्ये नुकताच तह झाल्यामुळे त्यांच्यात सख्य वाढले होते. सिद्दी याकूबने रमाबाईकडे वस्त्रे पाठविल्याचा आणि ही वस्त्रे घेऊन येणाऱ्या इसमांचा रमाबाईंनी

सन्मान उल्लेख आणि मिळाली. सिद्दीकडून भेट घेऊन येणाऱ्या अधिकाऱ्यांना एकूण २२५ रु. च्या परतभेटी मिळाल्या. ५) आपल्या पतीची तब्येत सुधारावी म्हणून रमाबाई नेहमी उपास - तापास करीत असत, परंतु त्यांच्या निष्ठेला व त्यागाला परमेश्वराची साथ मिळाली नाही.

इ.स १७७२ मध्ये माधवराव पेशव्यांची तब्येत फारच बिघडली. अनेक वैद्यांनी अनेक उपचार केले. पण प्रकृतीस आराम पडेना म्हणून थेऊरला येऊन राहिले. तेव्हा रमाबाईचा मुक्कामदेखील थेऊरला होता. थेऊरच्या गणपीतला माधवराव पेशव्यांनी दहा हजारांचा शिरपेच दिला. पण माधवरावांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत गेली. प्रत्येकजण आपापल्या परीने पेशव्यांचे प्राण वाचविण्याकरीता प्रयत्न करीत होता. रमाबाई प्रत्यक्ष पत्नी होत्या. त्या दूध व गोमूत्र यावरच राहत. कारभाराची सर्व भिस्त माधवरावांनी सखरामबापूवर टाकली व रमाबाईला आपल्याजवळ बोलावून सहगमनाविषयी उपदेश केला. ६) तेव्हा त्या इश्वर इच्छेप्रमाणे इतकेच बोलल्या त्या दिवसापासून त्या फक्त दूध आणि गोमूत्रावर राहिल्या माधवरावांच्या मृत्युपत्राच्या काही ऐवजामधील तपशील पुढीलप्रमाणे-

"आमचा अंतकाल झाल्यावर आमची स्त्री सौभाग्यवती रमाबाई सहमनाचा विचार निश्चयात्मक करून आहे त्यास इजला कोणी स्वकीये परकीये मोहात घालू नये. जो विचार आहे तो मभा विभवानुसार समारंभ करून करवावा त्यास व्यत्यत न व्हावा". ७) माधवराव पेशव्यांची तब्येत अतिशय बिघडल्याने अनेक धार्मिक कार्ये पार पाडण्यात आली. ब्राम्हणांस गाई दान करण्यात आल्या. या वेळेस पेशव्यांची स्थिती पाहून रमाबाईनी दि. २९-१०-१७७२ रोजी सतीची वस्त्रे आणण्यासाठी पुण्याला सांडणीस्वार पाठविला होता. त्यावरून त्यांनी सहगमनाचा निर्णय अधीच घेतला होता. हे स्पष्ट होते. या वेळेस पुण्यात पेशव्यांच्या मृत्यूची बातमी पसरली. पण नंतर ही बातमी थंडावली. पेशव्यांची तब्येत बुधवार कर्तिक वद्य अष्टमीला फारच बिघडली. बुधवार कर्तिक वद्य दोन घटका दिवस असतांना गजानन गजानन म्हणून मोठ्या योग्याप्रमाणे त्यांनी नेत्रांद्वारे प्राण सोडला. ८) या वेळेस रमाबाईचे वय पंचवीस वर्षाचे होते. सती जातेवेळी त्या अत्यंत शांत आणि गंभीर होत्या. आपल्या सर्व दागदागिने त्यांनी आलेल्या प्रत्येक सुवासिनीला दिले. ९) माधवरावांच्या मृत्यूनंतर त्या सती जाऊ नयेत म्हणून अनेकांनी रमाबाईंची विनवणी केली. त्या सर्वांना ईश्वरी सत्ता प्रमाण सती जाणे हा धर्म आपला आम्हास चवदा चंद्र होई जोपर्यंत स्वर्गवासी लाभ होतो. एवढेच रमाबाईनी सांगितले. १०) सती जाण्यापूर्वी धर्मशिलेवर उभे राहिल्यानंतर त्यांनी रघुनाथरावांना जवळ बोलावून नारायणरावांस रघुनाथरावांच्या हाती दिले व वडिलपणे सर्वाचे यथस्थित चालवावे, कोणालाही अंतर दऊ नये, असे सांगून त्या चितेवर आरुढ झाल्या. अगदी शांतपणे ह्या सतीने आपला देह आपल्या पतीसमवेत अग्नीला अर्पण केला.

११) रमाबाई पेशवे यांनी सती जातांना इनाम दिल्याचा उल्लेख पुढीलप्रमाणे -

राजश्री देशधिकारी लेखक वर्तमान व भावी ता. जालगाव सुभा दोभोल तो सुवर्ण दुर्ग गोय यांसिर्द अखंडलक्ष्मी आलंकृत राजमान्य (मो.जा.) माधवराव नारायण प्रधान आशीर्वाद व नमस्कार सु, इसने समानीन समयां व अलफ शेक १७०३ प्लव नाम संवत्सरे विसाजीराम व त्रिंबक कृष्ण व आपाजी गोविंद उपनाम बरवे गोत्र कौसिक सूत्र आश्वयलायन देश कुलकर्णी व खेरीज मौन टालसुरे करुन गाव कुलकर्णी म मजकूर यांणी हुजूर कों पुणे येथील मुकामी येऊन विनंती केली की आपण बहुत दिवस स्वामीसेवा येकनिष्ठपणे केली. कुटुंबवत्छल आशें यास्तव श्रीमंत कैलासवासी सौ. मातु:श्री रमाबाई यांणी सती जाते समई आपणास कुटुंबाचे योगक्षेमार्थ येक गांव

नंतर इनाम द्यावयविसी सांगितले आहे. त्याप्रमाणे स्वामींनी कृपालू होऊन यांस कुटुंबाचे योगक्षमार्थ मौजे पांगरी तार मजकूर हा गाव खेरीज सरदेशमुखी करुन दरोबस्त देखील हवसीपोटी कुल बाब कुल कान हाली पटी व पेस्तर पेटी जल तरूतृण काष्टपाषाण निधी निक्षेपसहीत खेरीज हकदार व करीम इमानदार करून इनामतिजाई सुधा सरकारातून नूतन इमान करार करून दिला असे तरी मौजे मजकूर सदरहू प्रमाणे याचे दुमाला करून देऊन त्यांस व यांचे पुत्रपौत्रीदि वोंशंपरंपरेने इनाम चालवणे दरसाल नवीन पत्राचा आक्षेप न करणे या परतोन देणे. जाणिजे. छ. २१ जिल्हेज ++ आज्ञा प्रमाण. १२) रमाबाई सती जातांना रामशास्त्रींनी बरीच धर्मकृत्ये केली. त्या प्रसंगी चवकडया, अंगठ्या, मोहरा, पुतळ्या तसेच इतर जडावाचे दागिने, शाली, लुगडी, किनखापी, गजनी इ. सणंग शिवाय नत्क रुपये एकूण १,७१,१२८७१० इतक्या रुपयांचा दानधर्म केला. या पूर्वी ५० हजार कांची कामाची देवाप्रित्यर्थ १८० गाईचे दान व मोक्षे धेनुदान इ. गोष्टी आधीच झाल्या होत्या. १३) पेशव्यांच्या घराण्यात सती जाणारी पहिली स्त्री रमाबाईच होय. राधाबाई, गोपिकाबाई, आनंदीबाई यापैकी कोणीच सती गेल्या नाहीत. पण रमाबाईनी मात्र पतिव्रत्य धर्माची शिकस्त केली. पतीच्या थोरपदाला साजेसे जीवन त्या जगल्या व त्यांचे आध्यात्मिक जीवन सफल करण्याकरीता त्यांच्या चितेवरील अग्नीवरील हसतमुखाने आरुढ होऊन त्यांनी आपल्या पतीसोबत सहगमन केले. रमाबाईच्या सहगमनावर लिहिलेल्या

पोवाड्याचा काही भाग उपलब्ध आहे. तसेच त्यांनी सहगमनसमयी केलेल्या धर्मादायाच्याही याद्यांची नोंद सापडते.

१४) आपली सारी धनदौलत आणि जडजवाहीर त्यांनी आपल्या नातेवाईकांना वाटून टाकली आणि माधवरावांच्या शवाबरोबर त्या स्मशानात गेल्या. तेथे सर्व धार्मिक विधी पार पाडल्यावर मोठ्या आश्चर्यकारक संथपणे आणि धैर्याने त्या चितेवर चढल्या. स्वत:च्या हाताने त्यांनी त्या चंदनाच्या चितेला अग्नी लावला नंतर ब्राह्मणांनी चितेत तूप व सुगंधी तेल ओतली.

रमाबाईचे वृंदावन थेऊरला गणपतीच्या देवळाजवळच्या नदीला पात्रात आहे.

थेऊरच्या समाधी - वृंदावनावरील अर्वाचीन शिलालेख श्रीमंती महासती सौभाग्यवती रमाबाईसाहेब पेशवे या आपले पती श्रीमंत माधवराव बल्लाळ पेशवे यांचे निधन होताच त्यांचे समागमे या स्थानी सती गेल्या. बुधवार कार्तिक वद्य ८ शके १६९४. (दि. १८-११-१७७२).

१५) एकंदरीत पाहता रमाबाईचा राजकारणामध्ये सहभाग अजिबात दिसून येत नाही. पण त्या आपल्या पतीच्या प्रकृतिस्वास्थ्यासाठी मात्र अविरतपणे झटल्याचे दिसून येते.

अशा प्रकारे छत्रपती घराण्यातील जिजाबाई, ताराबाई आणि करवीरच्या जिजाबाईप्रमाणे पेशवे घराण्यातील राधाबाई, गोपिकाबाई आणि आनंदीबाई यांचा मराठी सत्तेच्या राजकारणाशी अत्यंत जवळून संबंध आला होता.

थोरल्या जिलाबाईसाहेबांनी जशी शिवाजी महाराजांच्या सुरवातीच्या कालखंडात स्वराज्याच्या कारभाराची जबाबदारी सांभाळून व पुढे वेळोवेळी शिवाजी महाराजांना मार्गदर्शन व सहकार्य देऊन मराठी राज्यस्थापनेमध्ये महत्वाची भूमिका बजावली होती, त्याचप्रमाणे बाळाजी विश्वनाथाची पत्नी राधाबाई हिने बाजीराव पेशवा, चिमाजी अप्पा यांच्यांवर देखरेख करून त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन केले. उत्तर हिंदुस्थानाची यात्रा करून पेशवेपदाचे महत्त्व टिकवून ठेवण्याची महत्त्वाची कामगिरी त्यांनी बजावली होती. गोपिकाबाईंनी देखील नानासाहेबांच्या हयातीत त्याचप्रमाणे नानासाहेबांच्या मृत्यूनंतर आपला मुलगा माधवराव पेशवा यांच्या कालखंडात पेशवेपदाच्या आव्हानांना चातुर्याने सांभाळले होते. भाऊसाहेब, रघुनाथदादा इत्यादी मराठी राज्यातील कर्त्या पुरुषांना बरोबर घेऊन मराठी राज्याचा गाडा माधवराव पेशव्यांचे स्थान भाक्कम होईपर्यंत सांभाळला होता. आनंदीबाईनी तर पती रघुनाथरावाने पेशवा बनावे यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा केली. पतीने पेशवा व्हावे ही कोणत्याही पत्नीची स्वाभाविक इच्छा. त्याला आनंदीबाईंनादेखील मराठा राजकारणीची, पुण्यात घडत असलेल्या हालचालींची बरीच माहिती असे. या तिन्ही स्त्रिया ब्राह्मण घराण्यातील असल्याने त्या सुसंस्कृत व सुशिक्षित होत्या त्यांच्या स्वत:च्या हस्ताक्षरांतील पत्रव्यवहार मोठया प्रमाणात सापडतो. याच पत्रव्यवहारावरुन जरी या स्त्रिया प्रत्यक्ष युध्दमोहिमांवर गेलेल्या नसल्या, तरी पुण्यात राहून मराठी राजकारणावर कशा प्रकारे नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करीत होत्या, याची चांगली कल्पना येते.

त्यामुळे पेशवेकालीन मराठी इतिहासात पेशव्यांबरोबर त्यांनी देखील वेळोवेळी मराठी सत्तेच्या राजकारणात महत्वाची भूमिका बजावली होती, हे स्पष्ट होते.

**संदर्भ सूची**


१) राजवाडे वि. का. (संपा) - मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड ६, पृ.१९९

२) सरदेसाई गो. स. (संपा) - मराठी रियासत मध्यविभाग - ४, पृ.८१

३) सरदेसाई गो. स. (संपा) - मराठी रियासत मध्यविभाग - ४, पृ.२५७

४) सिध्देश्वरशास्त्री चित्राव - मध्ययुगीन चरित्रकोश, पृ ६९०
सरदेसाई गो. स. (संपा.) - पेशवे दप्तर, खं. ३२, पत्र क्र.१५९

५) सरदेसाई गो. स. (संपा) - पेशवे दप्तर, खं. ३२,

६) ओक प्रसाद - पेशवे घराण्याचा इतिहास पृ १०७

७) ऐतिहासिक संकिर्ण साहित्य - खंड ६ पृ. ७२-७३

८) खरेशास्त्री व्ही. व्ही - ऐतिहासिक लेखसंग्रह, खं. ३, पृ.१२२२

९) ओक प्रसाद - पेशवे घराण्याचा इतिहास, पृ. १०८

१०) सरदेसाई गो. सं. - मराठी रियासत मध्यविभाग - पृ. २३८, २३९

११) सरदेसाई गो. स. (संपा.) पेशवे दप्तर, खं. ३२ पत्र क्र. १९२

१२) सहस्त्रबुध्दें सखाराम अच्युत - श्रीमंत थोरले माधवराव पेशवे, पृ. ६७

१३) सरदेसाई गो. स. (संपा.) - पेशवे दप्तर, खं. ३२ पृ.१०५

१४) ऐतिहासिक संकीर्ण साहित्य - खंड ६, पृ. ७६ ले. ६९

१५) सहस्त्रबुध्दे सखाराम अच्युत ऱ्श्रीमंत थोरले माधवराव पेशवे, पृ. २६७